CNR.NO.MHPU090070562021 **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ८०४/२०२१**

**बिमला वि. सुभाष.**

**निशाणी क्रमांक ५ खालील आदेश.**

**( पारित दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ )**

०१. अर्जदाराने सदर अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे (थोडक्यात '२००५ चा कायदा') कलम २३ अन्वये दाखल केला आहे. त्यानुसार अर्जदाराने जाब देणारकडून रू. २ लाख दरमहा खावटी मिळण्याची मागणी केली आहे. तसेच, तिने अशी मागणी केली आहे की, ती राहत असलेल्या घरातून जाब देणाराने बाहेर काढू नये, असा जाब देणारला आदेश देण्यात यावे.

०२. अर्जदाराचा अर्ज, जाब देणारचा लेखी जबाब, कागदपत्र अर्जदाराने केलेली मागणी याचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले. त्या प्रत्येक मुद्द्यांचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | जाब देणारने अर्जदारावर घरगुती हिंसाचार केल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येते काय ? | **होय.** |
| २. | अर्जदार अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती व केव्हापासून ? | **होय, रू. ५,०००/— दरमहा, दि. ०६.०७. २०२१ पासून.** |
| ३. | आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता :**

०३. याठिकाणी हा वाद नाही की अर्जदार ही जाब देणारची पत्नी आहे. अर्जदाराचा असा दावा आहे की, जाब देणार तिला सतत मारहाण करायचा. जाब देणारच्या त्रासाला व मारहाणीला कंटाळून आत्महत्या करण्याच्या उद्देशाने तिने एकदा विष पिले होते. तिला डॉक्टरांनी उपचार करून वाचविले. जाब देणारने तिला जबर मारहाण करून तिच्या हाताचा अस्थीभंग केला होता. अर्जदाराला जिवंत ठेवणार नाही अशी जाब देणार धमकी देतो. जाब देणारचे दुस—या स्त्रीसोबत संबंध आहेत. तो अर्जदाराच्या अत्यावश्यक गरजांची पुर्तता करत नाही. सदर आरोप पाहता ते घरगुती हिंसाचाराच्या व्याप्तीमध्ये येतात. अर्जदाराच्या अर्जास तिच्या शपथपत्राचे पाठबळ आहे.

०४. जाब देणारने त्याचा लेखी जबाब आणि अर्ज नि.क्र. ५ च्या अर्जास जबाब (नि.क्र. १२) वर दाखल केला आहे. त्याने अर्जदाराचे आरोप फेटाळलेले आहेत. जाब देणारचा असा बचाव आहे की, अर्जदार त्याचेसोबत काही दिवस व्यवस्थित राहिली. त्याने तिला परपुरूषासोबत नको त्या अवस्थेत ब—याचवेळा पाहिले. अर्जदार व तिच्या मुलाने त्यास अनेकवेळा मारहाण केली. त्याला दि. ०९.०६.२०२१ रोजी मारहाण करून घरातून हकलून दिले. त्यामुळे तो वर्कशॉपमध्ये राहतो. त्याचा वर्कशॉपचा व्यवसाय सन २०१९ पासून बंद आहे. त्यामुळे त्याने अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

०५. जाब देणारचा जबाब पाहता त्याने अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेतला आहे. तो आरोप पुराव्याशिवाय विचारात घेता येणार नाही. अर्जदाराच्या दाव्यावरून प्राथमिक दृष्ट्या असे सिध्द होते की, जाब देणारने तिच्यावर घरगुती हिंसाचार केला आहे. ती जाब देणारची पत्नी आहे. त्यामुळे

ती कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २, ३ करिता</u>** :

०६. अर्जदाराचा असा दावा आहे की, तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. जाब देणारकडे ४ स्थावर मिळकती आहेत. जाब देणारची फॅब्रिकेशनची कंपनी आहे. त्याला त्यातून दरमहा रू. १० लाख इतके उत्पन्न मिळते. जाब देणारने असे कबूल केले आहे की, त्याचे एम.आय.डी.सी. भोसरी येथे वर्कशॉप आहे. परंतु, त्याचा असा बचाव आहे की, वर्कशॉप सन २०१९ पासून बंद आहे.

०७. अर्जदाराने तिचे मालमत्ता व जबाबदारीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानुसार तिचा मासिक खर्च रू. २ लाख आहे. तिचे स्वतंत्र उत्पन्न नाही. तिला वेगवेगळे आजार आहेत. तिच्या शपथपत्रानुसार जाब देणार रू. १० लाख उत्पन्न मिळवितो. तिने कागदपत्रांची यादी नि. क्र. ३/४ अन्वये जाब देणारचे कर विवरण पत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याचे सन २०१८—१९ मध्ये रू. ४,६८,५१०/— इतके उत्पन्न होते.

०८. जाब देणारने त्याचे उत्पन्न व जबाबदारीचे शपथपत्र निशाणी क्र. १४ वर दाखल केले आहे. त्यानुसार जाब देणारचा दरमहा खर्च रू. २०,०००/— आहे. अर्जदार हॉटेल चालविते व दरमहा रू. ३०,०००/— उत्पन्न मिळते. त्याबाबत जाब देणारने त्याचे लेखी जबाबात काहीही नमूद केले नाही. त्याच्याकडे घरे, वर्कशॉप, वडीलोपार्जित १३ गुंठ्ठे जागा आहे. अर्जदार व जाब देणार यांनी लग्नाअगोदर व लग्नानंतर एकूण ३० तोळे सोने खरेदी केले. त्याचे निव्वळ उत्पन्न रू. २,४०,०००/— आहे.

०९. अर्जदार ही जवळपास ५१ वर्षांची असून जाब देणार हा त्याच्या शपथपत्रानुसार ६८ वर्षे वयाचा आहे. जाब देणारचे उत्पन्न, त्याचे खर्च, अर्जदाराचे वय आणि गरजा पाहता माझे मते अर्जदाराला दरमहा रू. ५,०००/— अंतरिम खावटी मिळणे न्यायोचित ठरते. अर्जदाराने सदर अर्ज दि. ०६.०७.२०२१ रोजी दाखल केला आहे. तेव्हापासून आजपर्यंत जाब देणारने अर्जदाराला वस्तू किंवा पैशांच्या स्वरूपात मदत केली, असा जाब देणारचा दावा नाही. त्यामुळे अर्जदार ही अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दि. ०६.०७. २०२१ पासून अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहे. मी त्याप्रमाणे मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवित आहे.

१०. अर्जदाराने अशी मागणी केली आहे की, ती राहत असलेल्या प्लॉट क्र. ८, सेक्टर क्र. ४, 'द्वारका' स्वराज हौसिंग सोसायटी, संतनगर, स्पाईन रोड प्राधिकरण, मोशी, पुणे या घरातून जाब देणारने तिला बाहेर काढू नये, असे आदेश न्यायालयाने द्यावी. जाब देणारने अर्जदारावर घरगुती हिंसाचार केला आहे. एका वेळेस आत्महत्येस प्रवृत्त केले होते. त्यामुळे जाब देणार तिला घरातून बाहेर काढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे ती सदर अनुतोष मिळण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिता</u>** :

११. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्षांवर मुद्दा क्र. ४ चे समनार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अशंत: मंजुर केला आहे.

२. जाब देणारने अर्जदाराला दरमहा रक्कम रू. ५,०००/— अंतरिम खावटी, २००५ चा कायदा कलम २३ अन्वये दि. ०६.०७.२०२१ पासून द्यावी, असे याद्वारे आदेशित करण्यात येते.

३. जाब देणारने अर्जदाराला प्लॉट क्र. ८, सेक्टर क्र. ४, ‘द्वारका’ स्वराज हौसिंग सोसायटी, संतनगर, स्पाईन रोड प्राधिकरण, मोशी, पुणे या घरामधून बेदखल करण्याचा प्रयत्न करू नये किंवा बेदखल करू नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAJESH SHIWAJIRAO WANKHEDE
Date: 2022.11.24 13:42:23 +0530

दिनांक २३.११.२०२२

(आर. एस. वानखेडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पिंपरी, पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Gulagi P.S.- Grade 3. |
| Name of the Court | : | Shri. R. S. Wankhede<br>Judicial Magistrate (F.C.), Pimpri. |
| Date of Order | : | 23.11.2022. |
| Order signed by the P.O.on | : | 24.11.2022. |
| Order uploaded on | : | 24.11.2022. |